# मुंबईसाठी मेट्रो आवश्यक

## विरोधासाठी विरोध नको, व्यावहारिक दृष्टिकोन ठेवा



**प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना हायकोर्टाने फटकारले**

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - वाहतूककोंडी पाहता पर्यावरणाच्या नावाखाली विरोधासाठी विरोध करू नका. मुंबईसाठी मेट्रो आवश्यक आहे ही वस्तुस्थिती विचारात घेऊन व्यावहारिक दृष्टिकोन ठेवा अशा शब्दांत उच्च न्यायालयाने मेट्रोसाठी खारफुटी तोडण्यास विरोध करणाऱ्या स्थानिक रहिवासी व पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले.

मेट्रो-३ प्रकल्पाच्या बांद्रे-कुर्ला संकुल स्थानकासाठी खारफुटीची झाडे तोडण्यास परवानगी बंधनकारक आहे. ती मिळावी म्हणून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अर्जावर न्यायमूर्ती व्ही. एम. कानडे आणि न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली.

### पर्यावरणप्रेमींचा जोरदार विरोध

वृक्षतोडीवर आक्षेप घेणाऱ्या याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रॉबिन जयसिंघानी यांनी विरोध केला. मेट्रो प्रकल्प हा सीआरझेड क्षेत्रात येत असल्याने पर्यावरण खात्याची अद्याप परवानगी मिळालेली नाही. असे असताना खारफुटीची झाडे तोडून कायद्याचे उल्लंघन करण्याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास केला जात असल्याने परवानगी देऊ नये अशी विनंती केली. तसेच एमएमआरसीएलच्या अर्जाला उत्तर देण्यासाठी वेळ मागितल्याने न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जूनपर्यंत तहकूब ठेवली.

### न्यायालय म्हणते

मुंबईसाठी मेट्रोची गरज आहे. त्याला स्थानिक रहिवासी व कार्यकर्त्यांनी विरोधासाठी विरोध करण्याची गरज नाही. मुंबईतील वाहतूककोंडीचा प्रश्न जटील बनला आहे. तो सुटला पाहिजे. ही समस्या सोडवायची आहे, वाढवायची नाही. खरेतर मुंबईत मेट्रो ३० वर्षांपूर्वीच सुरू झाली पाहिजे होती. आता ३० वर्षांनंतर ही सेवा सुरू करण्याचा प्रयत्न सुरू आहे.